**दिनांक :- १८ - १ - २३**

**विषय :- निवडलेल्या ७ बिल्डर्स साठी सदनिकेंचे specifications आणि सोसायटी ची विश लिस्ट चा ड्राफ्ट फायनल करणे.**

पुनर्निर्माण योजनेचे सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि पंच समिती सदस्यांच्या १८ - १ - २३ रोजी झालेल्या मीटिंग मधे, जे ७ विकसक संस्थे ने शॉर्ट लिस्ट केले आहेत, त्यांना पुढील सविस्तर प्रेझेन्टेशन साठी टोटल प्रोजेक्ट ब्रीफ, सोसायटीत सध्या असलेल्या सदनिकांचे specifications तसेच संस्थे ची wish list आणि हव्या असलेल्या अमिनिटीज ची मागणी, ह्या वर सविस्तर चर्चा करून, विकसकांना जी पत्रं, सल्लागारांतर्फे पाठवायची आहेत, त्याचा मजकूर फायनल केला गेला.

विकसकांना त्याच्या लीगल structure ची माहिती तसेच त्यांच्या मोठ्या प्रोजेक्ट साईट आणि ऑफिसेस ची पाहणी करण्या साठी पंच समिती च्या भेटी ठरविण्या साठी मागल्या आठवड्यात पत्रं पाठवण्यात आली होती, त्याची उत्तरं आता येऊ लागली आहेत. त्या अनुशंगाने खालील ४ प्रोजेक्टस ला पंच समिति सदस्यांच्या भेटी नक्की केल्या गेल्या आहेत. ह्यात काही बदल झाला तसेच उरलेल्या ३ बिल्डर्स च्या प्रोजेक्टस आणि ऑफिसेस ला भेटी च्या तारखा ठरवून श्री कवडीकर आपल्याला कळवतील. सध्या ठरलेल्या कार्यक्रमा प्रमाणे --

१. दिनांक २१ - १ - २३ ला शुभम डेव्हलपर (नायती).
२. दिनांक २५ - १ - २३ ला हाई स्पॉट प्रिस्टिन.
३. दिनांक २७ - १ - २३ ला मेजेस्टिक लेंडमार्क.
४. दिनांक २८ - १ - २३ जोशी हुबळीकर, ह्या बिल्डर्स कडल्या भेटी ठरविण्यात आल्या आहेत.

प्रत्येक दिवशी निवडलेला बिल्डर् आपल्या पंच समिति सदस्यांना आपल्या कॉलोनीतून ठरलेल्या वेळेत पिक अप करेल आणि प्रोजेक्ट तसेच त्यांच्या ऑफिस ची विजिट झाल्या नंतर परत कॉलनीत आणून सोडेल. निघण्याच्या वेळेची माहिती पंच समिती ला वेळ ठरली की कळविण्यात येईल. ह्या विजिट ला फक्त पंच समिती सदस्यच जातील इतर सभासद नाही. त्यांना आवश्यक असल्यास पुढे कधी प्रोजेक्ट साईट्स वर नेता येईल.

ह्या मीटिंग मधे असे ही ठरविण्यात आले की ज्या ७ विकसकांना त्यांचे सविस्तर प्रेझेन्टेशन करायचे आहे ते भांडारकर इन्स्टिट्यूट च्या हॉल मधे करण्यात यावे. हा हॉल सर्व आधुनिक सुविधांनी परिपूर्ण आहे आणि अश्या प्रेझेन्टेशन साठी एकदम योग्य. हे प्रेझेन्टेशन ४ आणि ५ मार्च च्या सुमारास आयोजित करावी असे ही ठरविण्यात आले. हे प्रेझेन्टेशन ऑडियो - विजुअल प्रकाराचे तर असेलच पण त्याची पूर्ण हार्ड कॉपी ही सबमिट करावी अशी मांगणी बिल्डर्स ला करण्यात येईल.

आज फायनल केलेली पत्रं २० जानेवारी रोजी साती विकसांना पाठविण्यात येतील.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**